स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२६–२७/११९ दि. ३०/०६/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : दिनांक १ ते ७ जुलै, २०२६ या कालावधीमध्ये 'वन महोत्सव' आयोजित करण्याबाबत...
संदर्भ : मा. राज्य संपर्क अधिकारी, रासयो, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांचे क्रमांक:रासेयो–२०२६/प्र.क्र.६०/रासेयो कक्ष,दि. ३०/०६/२०२६ रोजीचे पत्र

महोदय,

उपरोक्त विषय आणि संदर्भीय पत्रान्वये दि. १ ते ७ जुलै, २०२६ दरम्यान 'वन महोत्सव' साजरा करण्यात यावा, असे सूचित करण्यात आले आहे. वातावरणीय बदलामुळे तापमानात वाढ, पाणी टंचाई, वायु प्रदुषण, जैवविविधत्तेचा ऱ्हास यासारख्या गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. तर शेती/कृषी क्षेत्रावर सुध्दा प्रतिकुल परिणाम झाले आहेत.

या समस्यांवर उपाय म्हणुन वृक्षारोपण व संवर्धन करणे हे सर्वांचे कर्तव्य आहे. त्यानुषंगाने आपल्या महाविद्यालयामधील विघार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याने दि. १ ते ७ जुलै, २०२६ दरम्यान 'वन महोत्सव' आयोजित करण्यात यावा.

तसेच याबाबतचा Jiotag Photo सह अहवाल BOD लॉगीनमध्ये NSS - Gov Other Reports - Add New - योजना/उपक्रम निवडा यामध्ये उपक्रमाचे नाव **"वन महोत्सव २०२६"** या विषयाची निवड करून सादर करण्यात यावा. सदर कार्यक्रमाचे सविस्तर पत्र आपल्या माहिती व उचित कार्यवाहीकरिता सोबत जोडले आहे. कळावे, ही विनंती.

Bhame.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : मा. राज्य संपर्क अधिकारी, रासयो, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांचे पत्र

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.**
एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.
ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र.०२२-२२६७९५६५

**क्रमांक: रासेयो-२०२६/प्र.क्र.६०/रासेयो कक्ष** **दिनांक: ३० जुन, २०२६**

**प्रति,**

**कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,**
रासेयो संलग्नित,
सर्व विद्यापीठे/ संचालनालये

**विषय:- दिनांक १ जुलै ते ७ जुलै, या कालावधीत "वन महोत्सव" आयोजित करणे बाबत.....**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यापीठे/संचालनालये व विद्यापीठांतर्गत महाविद्यालये, दत्तक गाव इ. ठिकाणी **१ जुलै ते ७ जुलै**, या कालावधीत **"वन महोत्सव"** दरवर्षी साजरा केला जातो. पावसाच्या सुरुवातीचा कालावधी हा वृक्षरोपणसाठी अत्यंत अनुकूल असतो.

***वन महोत्सवाचे उदिष्ट***

**आपणा सर्वानाच आज वातावरणीय बदल्लांचे परिणाम जाणवत आहेत. त्यामध्ये तापमानात वाढ, पाणी टंचाई, वायु प्रदुषण, जैवविविधत्तेचा -हास यासारख्या गंभीर समस्या निर्माण झाल्या असून इतकेच नव्हे तर शेती/कृषी क्षेत्रावर सुध्दा प्रतिकुल परिणाम होण्याचे भविष्यात संकेत मिळत आहेत.**

या सर्व समस्यावर उपाय म्हणुन वृक्षरोपण व संवर्धन हे आपणा सर्वाचे कर्तव्य आहे. त्यानुषंगाने आपण सर्वानीच या उपक्रमामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातुन इतर विद्यार्थी व समाजातील घटकांना एकत्र घेऊन हे महान कार्य करावे व पर्यावरणाचा होणारा -हास कमी करण्याचा प्रत्यन करावा.

या अनुषंगाने, याबाबत आपणाकडून करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा अहवाल, JIOTAG PHOTO सह एकुण वृक्षरोपन करण्यात आलेल्या झाडांच्या संख्येसह तसेच सदरील वन महोत्सव ज्या विद्यापीठे/संचालनालये व विद्यापीठांतर्गत महाविद्यालयात आयोजित करण्यात येणार आहे. त्या महाविद्यालयांचे नांव, मा.प्राचार्य यांचे नांव, रासेयो कार्यक्रम अधिकारी यांचे नांव, ई-मेल, मोबाईल क्रमांक इ. बाबतची माहिति रासेयो संपर्क अधिकारी, रासेयो कक्ष, मंत्रालय, मुंबई यांना अवगत करण्यात यावी.

**(डॉ. मिलिंद काळे)**
राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन

**प्रत- माहिती व योग्य त्याकार्यवाहीस्तव सादर.**
१.मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.

२.मा.अपर  मुख्य सचिव (उ. व तं.शि.) यांचे स्वीय सहाय्यक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई.
३.मा. उप सचिव(समन्वय) उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई.
४.रासेयो क्षेत्रिय संचालक, रासेयो क्षेत्रिय संचालनालय, पुणे.
५.निवड नस्ती रासेयो कक्ष